<table>
<tr><td rowspan="5">MHSO110017842024</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">३०/०४/२०२४</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">३०/०४/२०२४</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td colspan="3">१२/०६/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०२</td><td>०१</td><td>१३</td></tr>
</table>

## न्यायनिर्णयाची दुरुस्त प्रत

**३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी जी. एम. बिरादार)**

**नियमित दिवाणी दावा क्र. ५२२/२०२४**

**निशाणी क्रमांक – २०**

**सुभाष रामचंद्र घारमाळकर**
वय – ६० वर्षे, धंदा – शेती,
रा. लवंग, ता. माळशिरस, जि. सोलापुर. ... **वादी**

**विरुध्द**

**संतोष जगन्नाथ वाळेकर**
वय – ४० वर्षे, धंदा – शेती,
रा. तांबवे, ता. माळशिरस, जि. सोलापुर. ... **प्रतिवादी**

**.... दावा निरंतर ताकीदीचा**

---

वादीतर्फे विधीज्ञ : श्री. ए. डी. भगत

प्रतिवादी तर्फे विधीज्ञ : श्री. बी. आर. भिलारे,
विना कैफियत प्रकरण चालविणे.

---

## न्यायनिर्णय

## (दिनांक १२/०६/२०२६ रोजी जाहीर)

वादीने प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीच्या वहिवाटीस व ताब्यास प्रतिवादीला स्वतः अथवा त्यांच्या करवी इतर कोणीही हरकत अडथळा करु नये अशी निरंतर मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

### दावा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

२. मौजे लवंग, ता. माळशिरस, जि. सोलापुर येथील गट क्रं. १३५/१ याचे क्षेत्र ०२ हे. ९२ आर यास आकारणी रक्कम ०४.२० रुपये पैसे यापैकी ००–२८ आर व ००–०५ आर, अनुक्रमे दिंगंबर गेना भिलार व ज्ञानेश्वर धोंडीबा भिलारे यांना दक्षिण –पुर्व कोप–यातील विक्री करुन राहिलेले वादी व इतर सहहिस्सेदार यांचे समाईकातील क्षेत्र ०२ हे ५९ आर यास आकारणी रक्कम ०३–७५ रुपये पैसे क्षेत्र हा या दाव्याचा विषय असुन सदर दावा मिळकतीस यापुढे संक्षेपाकरीता 'दावा मिळकत' असे संबोधणेत आले आहे.

### वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः

३. मौजे लवंग, ता. माळशिरस, जि. सोलापुर येथील गट क्रं. १३५/१ याचे क्षेत्र ०२ हे. ९२ आर यास आकारणी रक्कम ०४.२० रुपये पैसे यापैकी ००–२८ आर व ००–०५ आर, अनुक्रमे दिंगंबर गेना भिलार व ज्ञानेश्वर धोंडीबा भिलारे यांना दक्षिण –पुर्व कोप–यातील विक्री करुन राहिलेले वादी व इतर सहहिस्सेदार यांचे समाईकातील क्षेत्र ०२ हे ५९ आर यास आकारणी रक्कम ०३–७५ रुपये पैसे क्षेत्र वादी व इतर सहहिस्सेदार चे वडिलोर्जीत मालकी वहिवाटीची आहे. ती सार्वजनिक नाही. सदर मिळकतीध्मये राहणारे मजुरांविरुध्द व जिल्हा परिषद, सोलापुर व इतर ३ यांचेविरुध्द अनुक्रमे कब्जासाठी व मनाईसाठी माळशिरस येथे प्रलंबित आहे. प्रतिवादी हा वादीचे दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने येवुन, त्यामध्ये राहणा–या मजुरांकडून दुध संकलन करणेसाठी वाहने घेवुन

येत आहे व दुध संकलन करीत आहे. त्यामुळे यातील वादीचे मिळकतीचे कब्जे, वहिवाटीस हरकत व अडथळे निर्माण होत आहेत. प्रतिवादीच्या सदरच्या कृत्यामुळे परिसरात गोंगाट, गोंधह निर्माण होत आहे. वादी व इतर सहहिस्सेदार यांचे व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येत आहे व शांततेचा भंग होत आहे आणि यातील वादी, इतर सहहिस्सेदार व त्यांचे कुटूंबीयांचे स्वास्थ बिघडू लागले आहे. यातील प्रतिवादी, वादी व इतर सहहिस्सेदार यांचे परवानगीशिवाय त्यांचे मिळकतीमध्ये प्रवेश करण्याचा कसलाही कायदेशीर हक्क, अधिकार नाही. त्यामुळे नाईलाजास्तव वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुत दावा दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादींनी स्वतः अथवा इतरांकरवी हरकत अडथळा करु नये अशी निरंतर ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**४.** प्रतिवादीला दाव्याकामी हजर होवुन पुरेशी संधी देवुन देखील कैफियत अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे नि.१ वर आदेश करुन सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द विना कैफियत चालविण्यात आला.

**५.** वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. डी. भगत यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला नाही. दाव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले, माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांची कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.नं | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दावा मिळकत ही वादीच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे हे वादी सिध्द करतात का ? | होय. |
| २ | प्रतिवादी हे दावा मिळकत वहिवाट करणेस हरकत अडथळा करतात का ? | होय. |
| ३ | वादी हे प्रतिवादीविरुध्द मनाई आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| ४ | अंतिम आदेश व हुकूम काय ? | दावा मंजूर. |

## कारणमिमांसा

६. **वादी पुरावाः–**

वादीने त्याच्या कथनाच्या पृष्टयर्थ खालील नमुद साक्षीदार तपासले आहेत.

| अ.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सुभाष रामचंद्र घारमाळकर | वादी स्वतः | **१३** |
| २. | सुशांत तुकाराम शेळके | वादीतर्फे साक्षीदार | **१६** |

वादीने तोंडी पुरावा संपल्याची पुरशिस नि.क्र. **१७** येथे दाखल केली आहे.

७. वादीने त्याचे तोंडी पुराव्याचे पृष्टयर्थ खालील कागदपत्रांचा आधार घेतला आहे.

| अ.क्रं | कागदपत्राचे वर्णन.. | नि. क्रं. |
|---|---|---|
| १. | मौजे लवंग येथील गट क्रं. १३५/१ चा ७/१२ उतारा | **१४** |
| २. | प्रतिवादीस वकीलामार्फत पोस्टाने पाठविलेली नोटीसची स्थप्रत | **१५** |

**मुद्दा नं. १ ते ४ बाबतः–**

८. सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रीतरित्या चर्चेसाठी घेण्यात आलेले आहेत.

९. वादी यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाण १३ कडे दाखल करुन मुळ दावापत्राशी सुसंगत असा मजकुर नमुद केलेला आहे. वादीच्या कथनानुसार वादीचे दावा मिळकतीपासुन काही अंतरावर उजनी कॅनॉलला चिकटून ''शिवामृत दुध संस्थेचे'' दुध

संकलन केंद्र आहे. त्याठिकाणी दावा मिळकतीमधील अनेक रहिवाशी सदर दुध केंद्रावर दुध घालणेसाठी जातात. प्रतिवादीस दावा मिळकतीमध्ये प्रवेश करुन, दुध संकलन करणेची कसलीही गरज नसताना, तो मुद्दाम यातील वादीना त्रास देणेसाठी सदरचे कृत्य करत आहे. प्रतिवादीस प्रतिबंद केल्याने दुध विक्रीत्यांची कसलीही गैरसोय होणार नाही. त्यांना उजनी कॅनॉल पट्टीवर दुध विक्री करणेसाठी शिवामृत दुध संस्थेचे संकलन केंद्र अस्तित्वात आहे. यातील प्रतिवादी हे जाणुन बुजुन वादी व इतर सहहिस्सेदार यांचे वर दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने दुध संकलन करणेसाठी वाहने घेवून येत आहे व मोठ मोठयाने गाडीचा हॉर्न वाजवून, परिसरातील शांतता भंग करत आहे. सदर कथनाच्या अनुषंगाने वादीने गट क्रं. १३५/१ चे ७/१२ उता–याची (निशाणी क्रं.१४) वर दाखल केलेली आहे. वादीने दाव्याच्या वादपत्रात व सरतपासात शपथेवर कथन केले आहे की, वादीचे दावा मिळकतीपासुन काही अंतरावर उजनी कॅनॉलला चिकटून ''शिवामृत दुध संस्थेचे'' दुध संकलन केंद्र आहे. त्याठिकाणी दावा मिळकतीमधील अनेक रहिवाशी सदर दुध केंद्रावर दुध घालणेसाठी जातात. प्रतिवादीस दावा मिळकतीमध्ये प्रवेश करुन, दुध संकलन करणेची कसलीही गरज नसताना, तो मुद्दाम यातील वादींना त्रास देणेसाठी सदरचे कृत्य करत आहे. यातील प्रतिवादीस प्रतिबंद केल्याने दुध विक्रीत्यांची कसलीही गैरसोय होणार नाही. त्यांना उजनी कॅनॉल पट्टीवर दुध विक्री करणेसाठी शिवामृत दुध संस्थेचे संकलन केंद्र अस्तित्वात आहे. यातील प्रतिवादी हे जाणुन बुजुन वादी व इतर सहहिस्सेदार यांचे वर दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने दुध संकलन करणेसाठी वाहने घेवून येत आहे व मोठ मोठयाने गाडीचा हॉर्न वाजवून, परिसरातील शांतता भंग करत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना दि. ०८/०८/२०२२ रोजी वकीलामार्फत नोटीस दिलेली आहे.

१०. वादीतर्फे साक्षीदार क्र. २ सुशांत तुकाराम शेळके यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाण १६ कडे दाखल करुन मुळ दावापत्राशी सुसंगत असा मजकुर नमुद केलेला आहे. त्यांच्या कथनानुसार साक्षीदार यांचे गट नं. १३७/१ ही मिळकत वाद

मिळकतीच्या शेजारीच आहे. सदर साक्षीदार यांनी वादी यांच्या पुराव्याला सुसंगत असा पुरावा दिलेला आहे.

**११.** प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्याचे समन्स लागू झाले असून दाव्यात हजर होवुन देखील त्यांनी आजतागायत कोणत्याही प्रकारे त्यांचे म्हणणे मांडलेले नाही. तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवर आपला हक्क सिध्द करण्याकरीता वादी यांचा उलटतपास घेतला नाही व कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

**१२.** वादीच्या एकुण पुराव्याअंती दावा मिळकत ही वादीच्या कब्जेवहिवाटीची असल्याचे सिद्ध केलेले आहे. निशाणी क्रं. १४ वरील ७/१२ उतारा पाहिले असता त्यामध्ये वादीचे नाव नमुद आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी आजरोजी संबंध व वहिवाट आहे हे दाखविणे करीता कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा युक्तीवाद केलेला नाही. यावरुन वादी हे दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाटदार असल्याचे स्पष्ट होते. वादी यांच्या एकुण पुराव्यावरुन दावा मिळकत ही वादीच्या मालकी व कब्जेवहिवाटीत असल्याचे सिध्द होते. तसेच संपूर्ण पुरावा पाहता वादी हे दावा मिळकत वहिवाट असताना प्रतिवादी हे हरकत व अडथळा निर्माण करतात ही बाब स्पष्ट होते. तसेच वादीची कोणतीही बाब प्रतिवादीने नाकारलेली नाही आणि वादीने शपथेवर केलेल्या कथनांमुळे प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई आदेश मिळण्यास वादी पात्र आहे.

**१३.** वादीने त्याची केस तोंडी व कागदोपत्री पुराव्यांवरुन शाबीत केली असल्यामुळे वादीचा दावा मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवतो. सर्वसाधारणपणे दिवाणी प्रकरणामध्ये जो पक्षकार आपली बाजु सिध्द करु शकत नसेल तर त्याला दाव्याचा खर्च दिला जात नाही. या प्रकरणामध्ये वादीने आपली बाजु सिध्द केलेली आहे. त्यामुळे वादी दाव्याचा खर्च मिळणेस पात्र आहे. सबब मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी स्वतः, नोकर, चाकर तसेच त्यांचे तर्फे ति–हाईत इसम यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दावा मिळकत गट क्रं. १३५/१ मधील वादी व इतर सहहिस्सेदार यांचे समाईकातील क्षेत्र ०२ हे ५९ आर यास आकारणी रक्कम ०३–७५ रुपये पैसे क्षेत्राच्या वादीच्या मिळकतीमध्ये अनाधिकाराने दुध संकलनासाठी येवू नये अशी कायम मनाईचा आदेश देण्यात येतो.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.06.12 16:04:21 +0530

दिनांक–१२/०६/२०२६

( जी. एम. बिरादार)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
माळशिरस.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : P. S. Kore

(b) Name of the Court : $3^{rd}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C Malshiras, Dist - Solapur

(c) Order signed by P.O. On : 12-06-2026.

(d) Order uploaded on : 12-06-2026.